**वाचा**:-1) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 अंतर्गत शाळांना परवानगी देण्याबाबत.
2) शासन निर्णय क्र.एसएफएस-1016/प्र.क्र.69/एसएम-2 दिनांक 17 जून 2016.
3) शिक्षण उपसंचालक,मुंबई यांचे पत्र जा.क्र.शिउस/माध्य-4/स्वअशा/16-17/2016/19029/154 दि.24/6/2016.
4) विस्तार अधिकारी शिक्षण विभाग प्राथमिक जि.प.ठाणे यांचेकडील तपासणी अहवाल.
5) मुख्याध्यापक लोकमान्य टिळक इंटरनॅशनल स्कूल कोपरखैरणे जि.ठाणे यांचा प्रास्ताव

---

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर
**आर.टी.ई.मान्यता**

जाक्र.ठाजिप/शिक्षण/प्राथ/प्रास-2/496
शिक्षण विभाग प्राथमिक
जिल्हा परिषद ठाणे
दिनांक :- ~~/04/2017~~ 05/05/2017.

**लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्था** संचालित **लोकमान्य टिळक इंटरनॅशनल स्कूल** कोपरखैरणे जि.ठाणे या शाळेस (इंग्रजी) या माध्यमातून प्राथमिक वर्गांना (इ.1 ली ते इ.8 वी ) स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सन 2016-17 या शैक्षणिक वर्षात शासनाने विहित केलेल्या खालील अटींच्या अधिन राहुन वरील शाळेस प्राथमिक वर्गांना प्रथम मान्यता देण्यांत येत आहे.

1) संस्था सदर शाळा स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर चालविण्यास आर्थिकदृष्टया सक्षम असली पाहिजे.
2) आर.टी.ई.अॅक्ट 2009 नुसार भौतिक सुविधा असणे आवश्यक आहे.
3) शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादा व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या अथवा मंजूरी दिलेल्या दराने वेतन व भत्ते दिले पाहिजेत.
4) संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे वर्गातील विदयार्थी संख्या, विदयार्थ्यांचे प्रवेश इत्यादी काटेकोरपणे पालन केले पाहिजे.
5) मुला-मुलींसाठी स्वंतत्र स्वच्छतागृहाची सोय व्हावी.
6) पालक शिक्षक संघ, माता पालक संघाची नियमाप्रमाणे स्थापना व कार्यवाही करावी
7) फी चे दर शासनाच्या निर्णयानुसार निश्चित करावेत.
8) कर्मचारी नियुक्ती करतांना रोष्टरनुसार शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नेमणूका कराव्यात.
9) शाळेची इमारत व परिसर शिक्षणास अनुकूल व सुरक्षित असला पाहिजे.
10) शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार वेतनश्रेण्या व सेवा शर्ती या अधिन राहुन कर्मचारी वर्ग नेमला पाहिजे.
11) सदर शाळांनी शसनाच्या/खात्याच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे (उदा. विदयार्थ्याच्या प्रवेशाबाबत व अन्य) काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
12) मुख्याध्यापकांच्या नियुक्तीस संबंधितशिक्षण निरिक्षक/शिक्षणाधिकारी यांच्याकडून मान्यता घेणे बंधनकारक राहील. शिक्षकांची अर्हता ही शासनाने/मंडळाने वेळोवेळी निश्चित केल्यानुसार असेल.
13) सदर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील मान्यता मिळविलेल्या संस्थेने संबंधित अधिका-यांशी पत्रव्यवहार करताना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा अशाप्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.
14) सर्व संबधितांच्या माहितीकरीता शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा असे जाहिर फलकावर दर्शविणे आवश्यक आहे.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद ठाणे**

**प्रत** :- मा.शिक्षण उपसंचालक मुंबई विभाग मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.